RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक १४६(२)] सोमवार, नोव्हेंबर २४, २०२५/अग्रहायण ३, शके १९४७ [पृष्ठे ८, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ५१५**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ नोव्हेंबर २०२५.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक एच.डी.-११०५/१/२०२४-पोल१अ.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत यापूर्वी काढलेले सर्व विद्यमान नियम, अधिसूचना, आदेश व संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील, राज्य राखीव पोलीस दलाच्या आस्थापनेवरील आयुधिक पोलीस अधीक्षक, गट अ आणि आयुधिक पोलीस उपअधीक्षक, गट अ या पदांच्या सेवाप्रवेशाचे विनियम करणारे पुढील नियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**— (१) या नियमांस, आयुधिक पोलीस अधीक्षक आणि आयुधिक पोलीस उपअधीक्षक, गट अ (सेवाप्रवेश) नियम, २०२५, असे म्हणावे.

(२) हे नियम, ते महाराष्ट्र शासनाच्या **राजपत्रात** प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या.**— या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,-

(१) "नियुक्ती प्राधिकारी" याचा अर्थ, आयुधिक पोलीस अधीक्षक, गट अ या पदाच्या बाबतीत राज्याचे मुख्यमंत्री आणि आयुधिक पोलीस उपअधीक्षक, गट अ या पदाच्या बाबतीत गृह मंत्री, असा आहे;

(२) "आयुधिक पोलीस अधीक्षक" याचा अर्थ, राज्य राखीव पोलीस दलाच्या आस्थापनेवरील शस्त्रे निरीक्षण शाखेमधील आयुधिक पोलीस अधीक्षक पद असा आहे;

(३) "आयुधिक पोलीस उपअधीक्षक" याचा अर्थ, राज्य राखीव पोलीस दलाच्या आस्थापनेवरील शस्त्रे निरीक्षण शाखेमधील आयुधिक पोलीस उपअधीक्षक पद असा आहे;

(४) "आयोग" याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग असा आहे;

(५) "पदवी" याचा अर्थ, सांविधिक विद्यापिठाची यंत्र अभियांत्रिकी शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता, असा आहे;

(६) "पदोन्नतीची पात्रता" याचा अर्थ, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी काढलेले नियम, शासन निर्णय किंवा आदेश यांमध्ये पदोन्नतीसाठी विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीनुसार असलेली पदोन्नतीची पात्रता असा आहे;

(७) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे;

(८) "वरिष्ठ वेतनश्रेणी" याचा अर्थ, भारतीय पोलीस सेवा (वेतन) नियम, २०१६ याच्या नियम ३ च्या पोट-नियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली वरिष्ठ वेतनश्रेणी, असा आहे.

**३.** आयुधिक पोलीस अधीक्षक, गट अ या पदावरील नियुक्ती राज्य राखीव पोलीस दलाच्या आस्थापनेवरील शस्त्रे निरीक्षण शाखेमधील आयुधिक पोलीस उपअधीक्षक हे पद धारण करणाऱ्या तसेच उक्त पदावर पाच वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित व अखंड सेवा झालेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल;

परंतु, जर पदोन्नतीच्या मार्गाने योग्य व्यक्ती उपलब्ध होत नसेल तर, उक्त पदावर भारतीय पोलीस सेवेतील वरिष्ठ वेतनश्रेणीमधील किंवा राज्य पोलीस सेवेच्या पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उपआयुक्त या संवर्गातील योग्य व्यक्तीची बदलीद्वारे नियुक्ती करता येऊ शकेल.

**४.** आयुधिक पोलीस उपअधीक्षक, गट अ, या पदावरील नियुक्ती,-

(क) राज्य राखीव पोलीस दलाच्या आस्थापनेवरील शस्त्रे निरीक्षण शाखेमधील आयुधिक पोलीस निरीक्षक, गट अ, हे पद धारण करणाऱ्या तसेच उक्त पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित व अखंड सेवा झालेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने; किंवा

(ख) आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारे, आयोगाने शिफारस केलेल्या, पुढील निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून, नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईलः-

**(एक) वयोमर्यादा.—**

(क) **किमान वयोमर्यादा.**- उक्त पदाच्या भरतीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास अठरा वर्षे पूर्ण केलेले पाहिजे.

(ख) **कमाल वयोमर्यादा.**- उक्त पदाच्या भरतीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी अडतीस वर्षे वय पूर्ण व राखीव प्रवर्गाच्या व्यक्तींसाठी त्रेचाळीस वर्षे वय पूर्ण केलेले.

**(दोन) किमान शैक्षणिक अर्हता.-.**

सांविधिक विद्यापिठाची यंत्र अभियांत्रिकी शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता धारण केलेली असावी.

**(तीन) शारीरिक अर्हता.—**

(क) **पुरुषांकरिता शारीरिक प्रमाण.—**

(एक) किमान उंची (से.मी. मध्ये) १६५ से.मी. (अनवाणी)

(दोन) छाती न फुगवता ७९ से.मी. पेक्षा कमी नसावी आणि न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ से.मी. पेक्षा कमी नसावा.

(ख) **महिलांकरिता शारीरिक प्रमाण.–** किमान उंची (से.मी. मध्ये) १५७ से.मी. (अनवाणी)

(ग) **दृष्टी.–** दुरुस्तीसह किंवा विनादुरुस्ती उत्तम दृष्टी व वर्णांध नसावी.

**(चार) तांत्रिक अर्हता.—**

भारत सरकारच्या किंवा महाराष्ट्र शासनाच्या किंवा इतर कोणत्याही राज्य शासनाच्या प्रशिक्षण संस्थेद्वारा प्रदान केलेले लघु शस्त्रे अभियांत्रिकीमधील पदविका प्रमाणपत्र धारण केलेले असावे.

**५.** नियम ४ मध्ये नमूद केलेल्या पदाच्या एकूण मंजूर पदसंख्येसाठी, पदोन्नतीने व नामनिर्देशनाने नियुक्ती देण्याचे प्रमाण हे अनुक्रमे ५०:५० असे राहील.

**६.** नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावरील नियुक्त्या या नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने करण्यात येतील.

**७.** नियम ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीला या पदाकरिता विहित केलेली विभागीय परीक्षा विहित केलेल्या कालमर्यादेत उत्तीर्ण करावी लागेल. जर, अशी व्यक्ती उक्त पदाकरिता विहित केलेली विभागीय परीक्षा विहित केलेल्या कालमर्यादेत उत्तीर्ण झाली नाही तर, अशा व्यक्तीस, उक्त परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा उक्त परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळेपर्यंत उक्त पदावर कायम करण्यात येणार नाही किंवा ती उच्च पदावरील पदोन्नतीकरिता पात्र ठरणार नाही.

**८.** नियम ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती झालेल्या उमेदवारास एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) पूर्ण करावा लागेल, त्याच्या सेवाज्येष्ठता संबंधातील सेवाविषयक बाबी, विभागीय परीक्षा व इतर सेवा संबंधीत बाबी यांचे, सामान्य प्रशासन विभागाद्वारे, वेळोवेळी काढलेले नियम व विनियम यानुसार विनियमन करण्यात येईल. तथापि, अशी व्यक्ती ही विहित केलेल्या कालमर्यादेत उक्त प्रशिक्षण कार्यक्रम समाधानकारकरीत्या पूर्ण करण्यात अपयशी झाली तर, तिची सेवा समाप्त केली जाण्यास पात्र असेल.

**९.** (१) नियम ३ किंवा ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त करावयाची व्यक्ती, उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी अगोदरच मराठी व हिंदी भाषा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, त्याबाबतीत शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण करेल.

(२) नियम ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, अगोदरच मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, त्याबाबतीत शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करील. ती व्यक्ती, या परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदांवरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

**१०.** (१) नियम ३ किंवा ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त करावयाची व्यक्ती, उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी, तिला संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, ती त्याबाबतीत शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करील.

(२) नियम ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीने, तिला संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, ती याबाबतीत शासनाने वेळोवेळी विहित केलेले असे संगणक हाताळणी प्रमाणपत्र, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत धारण करील. अशी व्यक्ती, असे प्रमाणपत्र धारण करीपर्यंत, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

**११.** (१) नियम ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ याच्या तरतुदींनुसार किंवा याबाबत, शासनाने, वेळोवेळी केलेले अन्य कोणतेही नियम, काढलेले आदेश किंवा कोणतेही संलेख यांनुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करील, अन्यथा उक्त पदावर नियुक्तीसाठी पात्र असणार नाही.

(२) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करण्याच्या दिनांकास, दोनपेक्षा अधिक अपत्ये असणारी व्यक्ती, शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अपात्र असेल.

(३) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, जर तिला, नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे सिद्ध झाले तर, ती व्यक्ती, शासकीय सेवेतील उक्त पदावर कायम राहण्यास अपात्र असेल.

**१२.** नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदांसाठी नियुक्त केलेल्या व्यक्तींची जेष्ठता यादी राज्यस्तरावर ठेवण्यात येईल. म्हणून उक्त पदावर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीसाठी पात्र असेल.

**१३.** शासनाने, वेळोवेळी केलेले कोणतेही नियम किंवा घेतलेले निर्णय यांमध्ये, कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीआधी किंवा नंतर, शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती देखील अशा शासकीय कर्मचाऱ्यास लागू असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व्यंकटेश भट,**
शासनाचे सहसचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 24th November 2025.

*NOTIFICATION*

Constitution of India.

No. H.D.-1105/1/2024-POL1A.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, notifications, orders or instruments issued in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Armourer Superintendent of Police, Group A and Armourer Deputy Superintendent of Police, Group A, on the establishment of the State Reserve Police Force under the administrative control of the Home Department of Government of Maharashtra, as follows:-

**1.** *Short Title and Commencement.*- (1) These rules may be called the Armourer Superintendent of Police and Armourer Deputy Superintendent of Police, Group A (Recruitment) Rules, 2025.

(2) These rules shall come into force on the date of publication of these rules in the *Maharashtra Government Gazette*.

**2.** *Definitions.*- In these rules, unless the context requires otherwise,-

(1) "Appointing Authority" means the Chief Minister of State Government in relation to the post of Armourer Superintendent of Police, Group A and the Minister for Home in relation to the post of Armourer Deputy Superintendent of Police, Group A;

(2) "Armourer Superintendent of Police" means the post of the Armourer Superintendent of Police in the Arms Inspection Branch on the establishment of the State Reserve Police Force;

(3) "Armourer Deputy Superintendent of Police" means the post of the Armourer Deputy Superintendent of Police in the Arms Inspection Branch on the establishment of the State Reserve Police Force;

(4) "Commission" means the Maharashtra Public Service Commission;

(5) "Degree" means a degree in Mechanical Engineering of a statutory university or any other qualification declared by the Government to be equivalent thereto;

(6) "Eligibility for promotion" means the eligibility for promotion in accordance with terms and conditions specified for promotion in the rules, resolutions or orders issued by the General Administration Department, from time to time;

(7) "Government" means the Government of Maharashtra;

(8) "Senior Scale" means the Senior Scale specified in sub-rule (*1*) of rule 3 of the Indian Police Service (Pay) Rules, 2016.

**3.** Appointment to the post of Armourer Superintendent of Police, Group A, shall be made by promotion of suitable person on the basis of seniority having eligibility for promotion from amongst the persons holding the post of Armourer Deputy Superintendent of Police, Group A, in the Arms Inspection Branch on the establishment of the State Reserve Police Force and having a regular and continuous service of not less than five years on the said post:

Provided that, if a suitable person is not available by promotion then a suitable person in the Senior Scale from the Indian Police Service or from the Superintendent of Police or Deputy Commissioner of Police cadre of the State Police Service may be appointed by transfer on the said post.

**4.** Appointment to the post of Armourer Deputy Superintendent of Police, Group A, shall be made by,-

(*a*) promotion of a suitable person on the basis of seniority having eligibility for promotion from amongst the persons holding the post of Armourer Police Inspector, Group A, in the Arms Inspection Branch on the establishment of the State Reserve Police Force having a regular and continuous service of not less than three years in the said post; or

(*b*) nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of the result of the competitive examination conducted by the Commission, who fulfils the following criteria, namely:—

(*i*) Age limit.—

(A) *Lower Age limit*.- Eighteen years of age should be completed as on the last date of receipt of application as per advertisement for recruitment to the said post.

(B) *Upper Age limit*.- Thirty-eight years of age completed for the persons not belonging to a reserved category and fourty-three years of age completed for the persons belonging to reserved category as on the last date of receipt of application as per advertisement for recruitment to the said post.

(*ii*) *Minimum Educational Qualification.-*

Possesses a degree in the Mechanical Engineering of a statutory university or any other qualification declared by the Government to be equivalent thereto.

(*iii*) *Physical Eligibility.—*

(A) Physical standards for male.-

(*I*) Minimum height (in centimetres) 165 centimetres (barefooted);

(*II*) Chest girth shall not be less than 79 centimetres deflated and the difference between deflated chest and expanded chest shall not be less than 5 centimetres.

(B) *Physical Standards for Female*.- Minimum height (in centimetres) 157 centimetres (barefooted).

(C) *Vision*.- Good vision with or without correction and shall not be colour blind.

*(iv) Technical Qualification*.-

Possess the Certificate of Diploma in Small Arms Engineering from a Training Institute of the Government of India or Government of Maharashtra or Government of any other State.

**5.** Appointment to the post mentioned in rule 4 by promotion and nomination shall be made in the ratio of 50:50, respectively, for the total number of sanctioned posts to be filled under rule 4.

**6.** The appointments to the posts mentioned in rules 3 and 4 shall be made with the approval of the Appointing Authority.

**7.** A person appointed to the post mentioned in rule 4 by nomination, shall be required to pass the prescribed Departmental Examination for the post within the prescribed limit. If such person fails to pass the said prescribed Departmental Examination for the post within the prescribed limit then he shall not be confirmed on the said post or considered for the promotion to the higher post until he passes said examination or has been exempted from passing the said examination.

**8.** A person appointed to the post mentioned in rule 4 by nomination and undergoing training under the Combined Probationary Training Programme (CPTP), service matters pertaining to seniority, Departmental examination and other service matters shall be regulated by rules and regulations by the General Administration Department, from time to time. However, if a person fails to complete the said training programme (CPTP) satisfactorily, within the prescribed period, his services shall be liable to be terminated.

**9.** (1) A person appointed to the posts mentioned in rule 3 or 4 by promotion shall pass the Marathi and Hindi Languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations before getting promoted to the next promotional post.

(2) A person appointed to the posts mentioned in rule 4 by nomination shall pass the Marathi and Hindi Languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, within prescribed time limit after appointment unless he has already passed or has been exempted from passing those examinations. He shall not be eligible for annual increment or for the promotion to the next promotional post, until he passes those examinations.

**10.** (1) A person appointed to the posts mentioned in rule 3 or 4 by promotion shall possess a certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, unless he has been exempted therefrom before getting promoted to the next promotional post.

(2) A person appointed to the posts mentioned in rule 4 by nomination shall possess a certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, within prescribed time limit after appointment, unless he has been exempted from possessing such certificate of Computer Operations, otherwise he shall not be eligible for annual increment or for the promotion to the next promotional post, until he possesses such certificate.

**11.** (1) A person appointed to the post mentioned in rule 4 by nomination shall submit a declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf, by the Government, from time to time, otherwise he shall not be eligible for appointment to the post.

(2) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family, shall be disqualified for the appointment in Government Service.

(3) After appointment of a person in the Government service, if it is proved that he has more than two children, then he shall be disqualified for the appointed post in Government service.

**12.** The seniority list of the persons appointed to post mentioned in rules 3 and 4 shall be maintained at State level. Therefore, such persons shall be liable to be transferred anywhere in the State of Maharashtra.

**13.** The terms and conditions specified by the Government, in any rules or resolutions issued by Government from time to time, before or subsequent to the appointment of any Government Servant shall also be applicable to the concerned Government Servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VENKATESH BHAT,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.